**-: प्रेस नोट :-** दिनांक : २७.०४.२०२२

| | |
|---|---|
| घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.विनोद सुवालाल पवार, वय – ४३ वर्षे, पद – उप कार्यकारी अभियंता, कार्यालय महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. मोर्शी विभाग, ता. मोर्शी जि. अमरावती.वर्ग – २ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/– रुपये तडजोडी अंती १२,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १२,०००/– रूपये |
| घटनास्थळ | आ.लो.से.उप कार्यकारी अभियंता श्री.पवार यांचे कॅबिन मध्ये, म.रा.वि.वि.कं. मर्या. मोर्शी विभाग |
| घटना तारीख व वेळ | दि.२७/०४/२०२२ चे अंदाजे १८.१५ वा. ते १८.२८ वा.दरम्यान |

<u>**थोडक्यात माहिती**</u> :– यातील तक्रारदार हे खाजगी कंत्राटदार असुन महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. मोर्शी विभाग, ता. मोर्शी जि. अमरावती येथे केलेल्या कुलर मेन्टनंस कामाची वर्क ऑर्डर देण्याकरीता उप कार्यकारी अभियंता श्री.पवार हे १५,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत आज दिनांक २७/०४/२०२२ रोजी तक्रार दिली असता सदर तक्रारी संबधाने उप कार्यकारी अभियंता श्री.पवार यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता लोकसेवक श्री.पवार, उप कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांना महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. मोर्शी विभाग, ता. मोर्शी जि. अमरावती येथे केलेल्या कुलर मेन्टनंस कामाची वर्क ऑर्डर देण्याकरीता तडजोडीअंती १२,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले असता लगेच आयोजित केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक उप कार्यकारी अभियंता श्री.पवार यांनी त्यांचे कार्यालयाचे कॅबिन मध्ये तक्रारदार यांचेकडुन १२,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.विशाल गायकवाड सा., अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.अरूण सांवत सा., श्री.देविदास घेवारे सा., घटक प्रमुख श्री.संजय महाजन सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु व पो.कर्मचारी विनोद कुंजाम, शैलेश कडु, निलेश महींगे व चालक सतिष किटुकले सर्व ला.प्र.वि.अमरावती यांनी पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :– अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर – १०६४ दुरध्वनी क्रमांक – ०७२१–२५५२३५५,२५५३०५५.

( अमोल कडु )
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती.